Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on : 06/09/2021 6 SEP 2021 Notice No. 105

## अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन २०२१–२२

नवीन (Fresh) व नूतनीकरण (Renewal)

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी

## Web site – www.scholarships.gov.in

केंद्र शासनाकडून **मुस्लिम, खिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन** अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१–२२ साठी **ऑनलाईन** भरण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण करण्यासाठी www.scholarships.gov.in ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्विकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. शै. वर्ष २०२१–२२ साठी केंद्रशासनामार्फत **ऑनलाईन फॉर्म भरण्याची अंतिम मुदत दि. ३०/११/२०२१ आहे. व शैक्षणिक वर्ष २०२१–२२साठी ४७५७५ संच निर्धारित केले आहेत.**

*** शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :**

११ वी ते पी.एच.डी, व्यावसायिक (डी.एड.,बी.एड्.,एम. एड्.,आय.टी.आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम.सी.व्ही.सी.अभ्यासक्रम. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

*** किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. मागील परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३. **अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.**
४. नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न २.०० लाखा पर्यंत असावे.

६. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल /वसूल केली जाईल.
७. विद्यार्थ्याने राष्ट्रीयकृत बॅंकेत स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे. सदर खाते आधारकार्डशी लिंक आणे आवश्यक आहे.
८. नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांस मागील वार्षीक परीक्षेत ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थी त्याच महाविद्यालयात व त्याच अभ्यासक्रमात शिकत असणे आवश्यक आहे.
९. विद्यार्थ्यांने घेतलेलेल्या अभ्यासक्रमाचा एक वर्ष कालावधी असणे आवश्यक आहे.

* अर्ज करण्याची पध्दत (नविन मंजुरी/नूतनीकरण)

१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. यासाठी National Scholarships(NSP) या मोबाईल ॲपची सुविधा देखील अर्ज भरण्यासाठी देण्यात आलेली आहे.

२) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या होमपेज वरील Frequently Asked Questions (FAQ) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण झाल्यास महाविद्यालयाशी संपर्क साधावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येण आवश्यक अनिवार्य आहे.

५) विद्यार्थ्यांने ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे. त्या अभ्यासक्रमाच्या प्रथमवर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांनी नूतनीकरणाचा अर्ज भरावा.

*** विद्यार्थ्यांनी फॉर्मसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

१. अर्जावर विद्यार्थ्याचे पासपोर्ट साईजचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरीसह असावा.
२. मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत.
३. महाविद्यालयाने संबधित विद्यार्थी त्या महाविद्यालयात असल्याबाबतचे तसेच डे स्कॉलर/ होस्टेलर याबाबतची पडताळणी केल्याबाबतचे प्रपत्र (Institution Verification form FAQs ) सोबत देण्यात आलेला आहे.
४. विद्यार्थ्याचे अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषित घोषणापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे व १८ वर्षाखालील विद्यार्थ्यांनी पालकांचे स्वयंघोषित घोषणापत्र/ प्रमाणपत्र जोडावे.
५. मा. तहसिलदार यांचा सन २०२०---२१ चा उत्पन्नाचा दाखला.
६. राष्ट्रीयकृत बॅंक पासबुकाच्या पहिल्या पानाची ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड नंबरची नोंद आहे, त्याची छायांकीत प्रत जोडावी. सदर बॅंक खाते चालू स्थितीत असावे.

७. आधार कार्डाची छायांकित प्रत जोडावी.
८. प्रवेश फी भरलेल्या चलनाची झेरॉक्स.
९. बोनाफाईड सर्टिफिकेट.
१० रहिवासी प्रमाणपत्र (डोमासाईल)
११. आधारकार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी आय.डी. स्लीप किंवा पॅनकार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सहा शिक्का असलेले फोटोसह बोनाफाईड सर्टीफिकेट जोडावे.
१२. वरील सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावीत व विद्यार्थ्यांनी त्यांच्या ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या हार्ड कॉपी सोबत सर्व कागदपत्रे महाविद्यालयात तपासणीसाठी त्वरित सादर करावे
१३. जे विद्यार्थी एस.टी, एस.सी, एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी, राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना या कॅटेगरीतील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा प्रवेश फी सवलतीमध्ये घेतलेला आहे. व महाडीबीटीवर स्कॉलरशिचा फॉर्म भरणार असल्यास अशा विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा स्कॉलरशिपचा फॉर्म भरता येणार नाही विद्यार्थ्यांना एका वेळेस एकाच योजनेमधील शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**तरी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांसहित दि. ०४/१२/२०२१ पर्यंत महाविद्यालयाच्या 'प्रशासन भवन' मध्ये जमा करावी याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 2021-22\Scholarship Notice 2021-22\Minority Scholarship 2020-21.docx